अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. १० जून २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २५१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


## कुंभारी जवळ म्हशी तुडवल्याने दुचाकी चालक गंभीर

**नवी दिल्ली** : दुचाकी वरून शेताकडे जात असताना पाठीमागून धावत आलेल्या म्हशी धडकून तुडवल्याने ३८ वर्षीय शेतकरी गंभीर जखमी झाले. ही घटना कुंभारी परिसरातील दोड्डी रोडवर शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. गोपाळ गेनप्पा चाबुकस्वार (वय ३८ रा. कुंभारी ता.दक्षिण सोलापूर) असे जखमींचे नाव आहे. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ते आपल्या दुचाकी वरून शेताकडे निघाले होते. दोड्डी रोडवरील अभिषेक धाब्याजवळ आले असता अचानक पाठीमागून पळत येणाऱ्या १० ते १२ म्हशींनी त्यांच्या दुचाकीला धडकले . ते खाली पडल्यानंतर म्हशी तुडवत गेल्याने त्यांच्या तोंडातील ३ दात पडले. आणि तोंडाला मार लागून ते जखमी झाले . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# सोलापुरात दाणादाण

## जिल्ह्यात दुष्काळाचे सुटे गिराण



- झोपडपट्यांमधील घरांमध्ये पाणी, संसार पाण्यात
- व्यंकटेश नगरात वाहने पाण्याखाली
- बाळे परिसरातील अनेक नागरी वसाहती पाण्याखाली
- पाणी घरात घुसून संसारपयोगी साहित्याचं मोठं नुकसान
- दोन ठिकाणी पडली झाडे
- महापालिकेकडून तातडीने मदत कार्य सुरु
- अनेक मार्गावरची खोळंबली वाहतूक
- नागरिकांची उडाली त्रेधातिरपीट
- जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सर्वदूर पाऊस बळीराजा आनंदला
- साधारण सहा वर्षानंतर खरीपासाठी प्रसन्नला वरुणराजा

### शहरात चार तासात ७२ मि.मि. विक्रमी पाऊस

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सोलापूर शहर परिसराला मृग नक्षत्राच्या पावसानं रविवारी अक्षरश: झोडपून काढले. सायंकाळी साडेपाच वाजता सुरु झालेला पाऊस रात्री साडेनऊनंतरही कोसळतच होता. साडेपाच ते साठआठ या दरम्यान तब्बल ७२.८ मि.मि. इतक्या विक्रमी पावसाची नोंद हवमान विभागाकडं झाली. सलग तब्बल साडेचार तासांहून अधिक पडलेल्या मोठ्या पावसानं सोलापुरात दाणादाण उडाली. गटारी तुंबल्यानं सकल भागासह झोपडपट्यांमधील घरांमध्ये पाणी घुसून नागरिकांचे संसार पाण्यात बुडाले. रहिवाशांची त्रेधातिरपीट उडाली. 'पाणी घरातसुद्धा अन् डोळ्यातसुद्धा' असे वास्तव निर्माण झाले.**



जय मल्हार नगरातील घरात शिरलेले पाणी



व्यंकटेश नगरात पाण्यात बुडालेली दुचाकी



होटगी रोडवर पावसाच्या पाण्याने तळ्याचे स्वरूप धारण केले होते.

दरम्यान, पंढरपूर, कुर्डुवाडी, मंगळवेढा, अक्कलकोट, पिलीव, टेंभुर्णी, उत्तर सोलापूर, मोहोळ आदी तालुक्याच्या सर्वदूर भागात आज सायंकाळनंतर मृग नक्षत्राच्या पावसानं जोरदार हजेरी लावला. सहा वर्षांनंतर यंदा खरीपाच्या पेरणीसाठी पाऊस पडत असल्यानं जिल्ह्यातील शेतकरी सुखावला आहे. यंदा दुष्काळाच्या झळांनी होरपळलेल्या आणि पिचलेल्या बळीराजाला पावसानं दिलासा दिला आहे. कोसळणाऱ्या पावसानं दुष्काळाची तीव्रता कमी होत आहे. ओढे, नाले यामध्ये काही प्रमाणात पाणी येत असल्यानं शिवाय खरीपाची पेरणी होण्याचं आशादायक चित्र निर्माण झाल्यानं दुष्काळाचं गिराण सुटण्यास मदत होणार आहे.

सोलापुरात आज रविवारी सायंकाळी काळंकुट्ट आभाळ भरुन सायंकाळी साडेपाच वाजता सलग चौथ्या दिवशी रविवारी मुसळधार पाऊस झाला. सुरुवातील तब्बल दीड तास मुसळधार पावसानं शहराला झोडपून काढलं. परिणामी गटारी तुंबल्याने घरांमध्ये पाणी शिरल्याच्या शेकडो तक्रारी आल्या. सोलापूरातील साधारण १६५ झोपडपट्ट्यांपैकी बहुतांश झोपडपट्ट्यांसह कल्याण नगर, निराळे वस्ती, कुमार चौक, मसिहा चौक, जुना हिरज नाका, लोकमान्य नगर, आनंद नगरसह होटगी रोडवर अनेक ठिकाणी पाणी साचले होते.

बाळे परिसरातील अनेक वसाहती, विजापूर नाका झोपडपट्टी परिसरातील घरांमध्ये पाणी शिरल्याचे सांगण्यात आले. व्यंकटेश नगर परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

रात्री साडेनऊ वाजेपर्यंत पावसाचा जोर कायम होता. सखल भागात जिकडे तिकडे पाणी साचले होते. सहा वाजण्याच्या सुमाराला घरांमध्ये पाणी शिरल्याच्या तक्रारी यायला सुरुवात झाली. या पावसामुळे नागरिकांसह बाजारपेठेतील छोट्या-छोट्या व्यापाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. याशिवाय सखल भागात साचलेल्या पाण्यातून गाडी चालविताना इंजिनमध्ये पाणी गेल्याने अनेक गाड्या बंद पडल्याने लोक गाडी ढकलत घर गाठत असल्याचे दिसून आले.

शहराच्या बाहेर पावसाने हजेरी लावल्यानंतर मध्यवर्ती भागात पावसाने चांगलाच जोर धरला. शहरातील मोदी, तुराट गल्ली, विजापूर नाका, मराठा वस्ती, कोनापुरे चाळ, घोंगडे वस्ती, वाडीया हॉस्पीटल परिसर, हुंडेकरी प्लॉट, हरिभाई शाळेच्या मागे, शेळगी, विजापूर वेस, झोपडपट्टी नंबर २, सत्तर फुट रोड, शास्त्री नगर, कुमठे,

(पान ३ वर...)

### 'हा' परिसर जलमय

कुमार चौक, विजापूर नाका झोपडपट्टी, हिरज नाका परिसरात नाले तुंबल्याचे दिसून आले. गणेश पेठ, पंखा विहीर, कुंभार वेस, निराळे वस्ती येथील नाल्यावर मोठ्या प्रमाणात बांधकामे झाली आहेत. त्यामुळे येथील घरांमध्ये पाणी शिरल्याची माहिती आहे.

### उजनीत सहा हजार क्यूसेकने आवक

सोलापूरसह जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणाच्या बाबतीत रविवारी गूड न्यूज आली आहे. उजनी धरणात दुपारपासून ६ हजार २८६ क्युसेक पाणी येऊ लागले आहे. तमाम सोलापूर गेल्या काही महिन्यांपासून ज्या प्रतिक्षेत होते, ती आता फलदायी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. पुणे जिल्ह्यात आणि उजनीच्या धरण क्षेत्रात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनीला दिलासा मिळत आहे. या पाण्याने धरण पूर्ण क्षमतेने भरणार नाही पण पाणी येण्यास आरंभ झाला आहे.धरणातील पाणीसाठ्यात थोडी थोडी वाढ होण्यास मदत होणार आहे. (सविस्तर पान ३)

### ठळक घडामोडी

१.होटगी रस्ता : आसरा चौक, महावीर चौक, येथील रस्त्यांवर पाणी साचले होते. २. सम्राट चौक : पोलिस चौकी, नीलकंठ बँक, कस्तुरबा मंडई, बाळीवेस येथील रस्ते झाले जलमय ३. जोडभावी पेठ : मंगळवार बाजार, गणेश पेठ, सोमवार पेठ, साखर पेठ आदी भागांत पाणीच पाणी ४. जुळे सोलापूर : कल्याण नगर परिसरातील अनेक घरात पाणी ५. शेळगी : नटराज सोसायटी, मित्र नगर, महताब नगर आदी भागांमध्ये पाणी साचले होते.

### ५६ ठिकाणच्या तक्रारी आल्या : कारंजे

सोलापूर शहरात घरात पाणी घुसल्याच्या जवळपास ५६ तक्रारी आल्या आहेत. त्यापैकी १० वाजेपर्यंत ३२ तक्रारींचे निराकरण कर्मचाऱ्यांनी केले. कमी वेळेत जास्त पाऊस झाल्यामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरले. महापालिकेच्या यंत्रणा रात्रभर कार्यरत राहिली, असे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी सांगितले.

### कल्याण नगर येथील घरांमध्ये पाणीच पाणी

कल्याण नगर भाग १ येथील अनेक घरांमध्ये गटाराचे पाणी शिरले. गणेश नगर भागातील ड्रेनेज लाइनच्या पाइप लाइनचे तोंड कल्याण नगरजवळ आहे. पावसामुळे या पाइप लाइनमधील घाण पाणी बाहेर पडून घरांमध्ये शिरले. या गटाराच्या पाण्यासोबत कचऱ्यासह किटक नागरिकांच्या घरामध्ये आले होते. घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले होते. पावसाचा जोर ओसरल्यानंतर नागरिक हताश झाले होते. महापालिकेची यंत्रणा रात्री उशिरापर्यंत या भागात पोहोचली नव्हती. गेल्या दहा वर्षापासून कल्याण नगर या सखल भागांमध्ये अनेक नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी जाऊन संसार उपयोगी साहित्याचे नुकसान होत आहे. त्यामुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने वारंवार आ. सुभाष देशमुख यांना निवेदन देऊन तक्रार केली आहे. मात्र हा प्रश्न मिटलेला नाही.

# मै नरेंद्र दामोदरदास मोदी...

## तिसऱ्यांदा घेतली पंतप्रधानपदाची शपथ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**



मै नरेंद्र दामोदरदास मोदी... हे वाक्य ऐकलं आणि अख्ख्या देशभर एकच जल्लोष उसळला. एकून ७२ मंत्र्यांनी आज शपथ घेतली. पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी शपथ घेतली. त्यामुळे पुण्याला १० वर्षांनी केंद्रीय मंत्रीपद मिळाले. सलग तिसऱ्यांदा शपथ घेण्याच्या पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विक्रमाशी बरोबरी करणारा हा शपथविधी असल्याने देशभरात भाजपा कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. महाराष्ट्रातून नितीन गडकरी, पियुष गोयल, प्रताप जाधव, रक्षा खडसे, रामदास आठवले आणि मुरलीधर मोहोळ यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. तिसऱ्यांदा शपथ घेत मोदींनी हॅटट्रीक साधली आहे. मोदींच्या शपथविधी सोहळ्याला अनेक देशांच्या प्रमुखांनी उपस्थिती लावली आहे. एनडीएतील घटक पक्षांसह देशाभरातील खासदार आणि बॉलिवडू सेलिब्रिटींनी पीएम मोदींना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपती भवनात मोदींचा शपथविधी सोहळा पार पडला आहे. यावेळी पीएम मोदींनी पद आणि गोपिनियतेची शपथ घेतली. नवीन सरकारमध्ये एनडीएच्या विविध घटकांना मंत्रिमंडळात समाविष्ट करण्यासाठी भाजप आणि मित्रपक्षांमध्ये चर्चा झाली होती, त्यानंतर हा शपथविधी सोहळा पार पडला आहे.

पंतप्रधान नरेंद मोदी यांच्यानंतर राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. यापूर्वीच्या सरकारमध्ये अमित शाह यांच्याकडे गृहखाते होते. तर नितीन गडकरी भूपृष्ठ आणि रस्ते वाहतूक मंत्रिपदाचा पदभार सांभाळत होते. यापूर्वी १० वर्षे त्यांनी या खात्याचा पदभार सांभाळला आहे.

मोदी यांच्यानंतर, राजनाथ सिंह अमित शाह, नितीन गडकरी, निर्मला सीतारमन, जे.पी. नड्डा, एस जयशंकर, शिवराजसिंह चौहान, मनोहरलाल खट्टर, कुमारस्वामी, पियुष गोयल यांनीही शपथ घेतली.

### ७२ मंत्र्यांनी घेतली एकाच दिवशी शपथ

# जम्मू-कश्मीरमध्ये भाविकांच्या बसवर दहशतवादी हल्ला, १० जणांचा मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधी**




जम्मू-काश्मीरमध्ये तीर्थक्षेत्रावरुन येणाऱ्या भाविकांच्या बसवर संशयित दहशतवाद्यांना गोळीबार केल्याची घटना समोर आली हे. या दहशतवादी हल्ल्यात दहा जणांचा मृत्यू झाला आहे. हल्ल्यानंतर बस दरीत कोसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बस शिवखोडा मंदिरातून कटरा येथे परतत होती. त्यावेळी दहशतवाद्यांनी या बसवर गोळीबार केला.

घटनेची माहिती मिळताच, स्थानि प्रशासन, लष्कर, पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे. बस दरीत कोसळल्याने मृतदेह देखील विखुरले गेले आहे. सध्या मदतकार्य सुरु आहे. स्थानिक लोक देखील बचाव कार्यात मदत करताना दिसत आहेत.


१६ डिसेंबर २०२३ रोजी बीएसएफच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने गुप्तचरांचा हवाला देत माहिती दिली होती की २५० ते ३०० दहशतवादी पाकिस्तान सीमेवर लॉन्चपॅडवर आहेत. ते जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. या अधिकाऱ्याने सांगितले की, सुरक्षा दलांना सतर्क करण्यात आले आहे. सीमेपलीकडून घुसखोरींचा कोणताही प्रयत्न हाणून पाडला जाईल.

बीएसएफचे आयजी अशोक यादव यांनी पुलवामा येथे सांगितले की, दहशतवादी कारवाया पाहता आम्ही आणि लष्कर संवेदनशील भागांवर लक्ष ठेवून आहोत आणि सतर्क आहोत. गेल्या काही वर्षांत सुरक्षा दल आणि काश्मीरमधील जनता यांच्यातील बंध वाढले आहेत. जनतेने आम्हाला सहकार्य केल्यास आम्ही विकासकामे अधिक चांगल्या पद्धतीने पुढे नेऊ शकतो.

# हद्दवाढमधील सिटी सर्व्हेला 'बिग स्पीड ब्रेकर' मिळकतदारांना प्रॉपर्टी कार्ड देणं ठरतंय मृगजळ

### तिसरा डोळा


– प्रकाश पोरे



गेल्या महिन्यात माणूस वाळत होता, आता कपडे वाळत नाहीत!

**सोलापूर/प्रतिनिधी**

**शहरात समाविष्ट झालेल्या १४ गावच्या नगर भूमापनाचे काम पुन्हा ठप्प झाले आहे. हे काम पूर्ण करून हद्दवाढ भागातील मिळकतदारांना प्रॉपर्टी कार्ड देण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन, महापालिका आणि भूमी अभिलेख कार्यालयाने केले होते. या कामाला ब्रेक लागला आहे. भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी मुंबईत बसलेल्या अधिकाऱ्यांकडे बोट दाखवीत आहेत.**



- भूमी अभिलेख कार्यालयाचे मुंबईतील अधिकाऱ्यांकडे बोट
- जागा खरेदी-विक्रीमधील फसवणुकीच्या प्रकारांवर निर्बंध आणण्यासह गृहकर्जे, हिस्से वाटणी आदींना 'खो'

हद्दवाढ भागात ३५ वर्षांपूर्वी सिलिंगची जागा होती. १९९२ मध्ये हद्दवाढ झाल्यानंतर ११ ग्रामपंचायतींचे असिसमेंट दप्तर पालिकेकडे जमा केले. हद्दवाढ भागातील जमिनी प्लॉट पाडून विकल्या. असेसमेट खरेदी २००२ मध्ये शासनाने बंद केली तरीपालिका नोटरीद्वारे व्यवहार नोंद करत होते. ते बंद केले. त्यामुळे लाखभर मिळकती नोंदी थांबल्या आहेत. हद्दवाढीतील १४ गावांचे नगर भूमापन झाले नाही. भूखंडाची हद्द व क्षेत्रफळ निश्चित नाहीत.

दरम्यान, महसूल विभागाने मार्च २२ मध्ये हद्दवाढ भागाच्या भूमापनाचा निर्णय घेतला. तीन महिन्यांनी पथकाची नियुक्ती केली. नेहरू नगर भागाचा सर्व्हे केला. काम ठप्प झाले आहे. भूमी अभिलेख अधिकारी मूंबईकडे बोट दाखवीत आहेत.

### 'या'साठी प्रॉपर्टी कार्डची आवश्यकता

हद्दवाढ भागात एकच जागा, फ्लॅट दोघांना, तिघांना विकण्याचे प्रकार सुरू आहेत. या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रॉपर्टी कार्डची आवश्यकता आहे. प्रॉपर्टी कार्ड नसल्याने अनेक नागरिकांना गृहकर्ज काढता येत नाही. आपला खरेदी- विक्री व्यवहार कायदेशीर करून घेता येत नाही. हा प्रकार थांबविण्यासाठी प्रॉपर्टी कार्डचे काम तत्काळ सुरू होणे आवश्यक आहे.

### 'या' भागाला होणार फायदा

प्रॉपर्टी कार्डमुळे नई जिंदगी, स्वागतनगर, कुमठा नाका, मजरेवाडी, सहारानगर, नीलमनगर, विडी घरकुल, अक्कलकोट रस्ता परिसर, गांधीनगर, शेळगी, बाळे, सोरेगाव, कुमठे, विमानतळ, हत्तुरेवस्ती, भारत मातानगर येथील नागरिकांचा फायदा होणार आहे.


सुराज्य सोलापूर

१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३



पाहिजेत

दैनिक सुराज्यसाठी खालील ठिकाणी **तालुका प्रतिनिधी** नेमणे आहेत.

- करमाळा
- माळशिरस
- माढा
- मंगळवेढा
- मोहोळ
- सांगोला

**तालुका प्रतिनिधीसाठी किमान आवश्यकता :**

तालुक्यातील राजकीय, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास स्वतंत्रपणे लिखाण करण्याची क्षमता.

तालुक्याची भौगोलिक माहिती आवश्यक.

अनुभवी उमेदवारास आकर्षक वेतन + इन्सेन्टिव्हज्

खालील पत्त्यावर ८ दिवसांत अर्ज करावेत.

dailysurajyaoffice@gmail.com